<u>**सी.एन.आर.नं. एमएचएसआय ०७—०००१५ —२०११**</u>

<u>**नि.दि.मु.क्र. ०४/२०११ मधील नि.क्र. ११३ वरील आदेश**</u>

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतीचा कब्जा व हक्कप्रस्थापना मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १० याने नि.क्र. १ वरील त्याच्याविरुध्द दावा अतिरिक्त कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील त्याचे थोडक्यात कथन असे आहे की, दि. १६/०६/२०१७ रोजी त्याच्याविरुध्द वरील प्रमाणे आदेश पारीत झालेला आहे. वादीने प्रस्तुतकामी दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केल्यानंतर तो अर्ज मंजूर झाला व त्याप्रमाणे त्याने दावा दुरुस्त करुन घेतला. तथापि, प्रतिवादी क्र. १० यास दुरुस्त दाव्यास अनुसरुन अतिरिक्त कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे कारण आवश्यक ती कागदपत्रे महसूल विभागाकडून त्याला वेळेत प्राप्त झालेली नाहीत व तो त्यांच्या व्यवसायात व्यस्त असल्याकारणाने वकिलांना भेटू शकला नाही. अतिरिक्त कैफियत दाखल न करण्यापाठीमागे त्याचा हलगर्जीपणा अथवा बेफिकिरपणा कारणीभूत नव्हता. सबब त्यांची अतिरिक्त कैफियत दाखल करुन घेण्यात यावी. तसे न झाल्यास प्रस्तुत प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन प्रस्तुत प्रतिवादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून अर्जातील नमूद कारणे खोटी आहेत. कोणती कागदपत्रे महसूलदफ्तरातून उपलब्ध होण्यास प्रस्तुत प्रतिवादीस विलंब झाला हे त्याने अर्जात नमूद केलेले नाही. अर्जामध्ये अतिरिक्त कैफियत दाखल करण्यास किती विलंब झाला आहे हे त्याने नमूद केलेले नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १० याने अतिरिक्त कैफियत मुदतीत हजर न केल्याने दि. १६/०६/२०१७ रोजी त्याच्याविरुध्द नि.क्र. १ वर दावा अतिरिक्त कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा आदेश पारीत झालेला आहे. अर्जातील नमूद कारणे संयुक्तिक असल्याचे कोठेही दिसून येत नाही. तथापि, दाव्यातील वादीची मागणी लक्षात घेता, न्यायाच्या दृष्टिकोनातून प्रतिवादी क्र. १० यास संधी देणे न्यायोचित होईल. तथापि, प्रतिवादी क्र. १० याने अतिरिक्त कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब लक्षात घेता, त्याच्यावर रक्कम रु. ५००/— (रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीला देवू करुन अर्ज मंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज प्रतिवादी क्र. १० याच्यावर रक्कम रु. ५००/— (रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. १६/०६/२०१७ रोजीचा प्रतिवादी क्र. १० याच्याविरुध्द दावा अतिरिक्त कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १० याने वादीला पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :— २१ डिसेंबर, २०१७ (आर.आर.काळे)

ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.